# मंत्रिमंडळ निर्णय

२ मे २०१७

( बैठक क्र. १२८ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | राज्यातील ३१ हजार ४५९ धरणांचा समावेश<br>**गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी** | जलसंधारण |
| २ | **कुळगाव-बदलापूर येथील आरक्षणात फेरबदलास मंजुरी** | नगर विकास (१) |

राज्यातील ३१ हजार ४५९ धरणांचा समावेश

## गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी

राज्यातील धरणे व जलसाठ्यांच्या साठवण क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने धरणांमधील गाळ काढून तो शेतामध्ये वापरण्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

राज्यातील लघु पाटबंधारे तलाव, साठवण तलाव, गाव तलाव, पाझर तलाव आणि विदर्भातील माजी मालगुजारी तलाव यामध्ये मोठ्या प्रमाणात गाळाचा साठा झाला आहे. गाळाचा साठवणक्षमतेवर होणारा परिणाम लक्षात घेता अडीचशे हेक्टरपेक्षा कमी लाभक्षेत्र असलेल्या आणि ५ वर्षांपेक्षा जुन्या सुमारे ३१ हजार ४५९ धरणांमधील गाळ काढण्याची मोहीम प्राथम्याने राबविली जाणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यातील अशा ८२ हजार १५६ धरणांपैकी ३१ हजार ४५९ धरणांमध्ये साचलेला गाळ उपसा करून शेतात पसरविण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेमुळे धरणांची मूळ साठवण क्षमता पुनर्स्थापित होण्याबरोबरच कृषी उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे. तसेच शेती आणि पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल.

या योजनेनुसार स्थानिक शेतकऱ्यांना मोफत गाळ मिळणार असून त्यांना तो स्वखर्चाने शेतामध्ये वाहून न्यावा लागणार आहे. गाळासाठी आकारण्यात येणारे स्वामित्व शुल्क आणि अर्जासाठीचे शुल्क माफ करण्यात आले आहे. गाळ उपसण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री व इंधनावरील खर्च शासनाकडून तसेच सीएसआरच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीतून करण्यात येईल. या योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे जीओ टॅगिंग आणि माहितीचे संगणकीकृत संकलन करण्याबरोबरच स्वतंत्रपणे त्रयस्थ यंत्रणेमार्फत मूल्यमापन केले जाणार आहे. या योजनेनुसार केवळ गाळ उपसा करण्यास परवानगी देण्यात आली असून वाळू उत्खननास पूर्णत: बंदी घालण्यात आली आहे.

या योजनेनुसार गाळ काढण्यात येणाऱ्या धरणांची साठवण क्षमता ४२.५४ लक्ष स.घ.मी. इतकी असून सिंचन क्षमता ८ लाख ६८ हजार हेक्टर इतकी आहे. या धरणांमध्ये अंदाजे ५.१८ लक्ष स.घ.मी. एवढ्या गाळाचे प्रमाण आहे. हा गाळ काढण्यासाठी सुमारे ६ हजार २३६ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने संपूर्ण गाळ काढण्यात येणार आहे.

धरणामध्ये साचलेला गाळ स्वखर्चाने वाहून नेण्यासाठी धरणालगतच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांकडून करण्यात येणारे मागणीचे प्रस्ताव संबंधित गावातील सरपंच किंवा अशासकीय संस्था किंवा स्थानिक मंडळांमार्फत संबंधित तहसिलदार यांना सादर करण्यात येतील. प्रस्तावानुसार तहसिल क्षेत्रातील शासकीय यंत्रणेमार्फत धरणातील जलसाठा, गाळ उपसा परिमाण, गाळ व मृद चाचण्या इत्यादी बाबी प्रमाणित करून त्यानुसार प्रकल्प अहवालास मंजुरी देण्यात येईल. उपविभागीय अधिकाऱ्यांकडून देण्यात येणाऱ्या प्रशासकीय मान्यतेनुसार प्रत्यक्ष गाळ उपसण्याची कार्यवाही होईल. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा आणि तालुका या स्तरांवर समित्या स्थापन करण्यात येणार आहेत.

-----०-----

## कुळगाव-बदलापूर येथील आरक्षणात फेरबदलास मंजुरी

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ कुळगाव-बदलापूर व परिसरातील मौजे कुळगावमधील सर्व्हे क्रमांक ५४ हिस्सा क्रमांक ६ या जमिनीवरील १३०० चौरस मीटर क्षेत्रावरील मैदानाचे आरक्षण वगळून ती रहिवास विभागात समाविष्ट करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

अंबरनाथ कुळगाव-बदलापूर व परिसरासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या परिसरासाठी १२ ऑगस्ट २००५ मध्ये नगर विकास विभागाच्या अधिसूचनेनुसार विकास योजना अंमलात आली असून मौजे कुळगाव येथील सर्व्हे क्रमांक ५४ हिस्सा क्रमांक ६ ही जमीन आरक्षण क्रमांक ६८ नुसार खेळाचे मैदान या आरक्षणात समाविष्ट आहे. या जमिनीवर सध्या तळ अधिक तीन मजल्यांची इमारत आहे. या इमारतीला १९९० मध्ये तत्कालीन कल्याण-डोंबिवली महापालिकेने बांधकाम परवानगी दिली होती तर १९९३ मध्ये कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेने बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिला होता. त्यामुळे या इमारतीबाबत शासनाची पूर्व बांधिलकी विचारात घेता या जमिनीवरील सर्व्हे क्रमांक ५४ मधील एकूण १२ हजार चौरस मीटर क्षेत्रापैकी हिस्सा क्रमांक ६ मध्ये समाविष्ट असलेल्या १३०० चौरस मीटर जमिनीवरील खेळाचे मैदान या आरक्षणात फेरबदल करून ते रहिवास विभागात समाविष्ट करण्याचा शासनाकडे प्रस्ताव होता. त्यानुसार योग्य ती चौकशी आणि नगर रचना संचालकांच्या सल्ल्यानुसार या जमिनीवर आरक्षण फेरबदलास मंजुरी देणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले होते. त्यानुसार हा प्रस्ताव आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत ठेवण्यात आला, त्यास मंजुरी देण्यात आली.

-----०-----